**प्रेसनोट दिनांक- २७/०७/२०१९**
**समर्थ पोलीस स्टेशन पुणे**
**पत्नीची पोटगी रक्कम थकविणारे पतीस पोलीसांनी केली अटक**

एक विवाहित महिला,रा.पालखी विठोबा चौक,नानापेठ,पुणे यांचा विवाह सुमारे नऊ वर्षापूर्वी सचिन यांचेशी झालेला असून,त्यांना एक मुलगी देखील आहे. परंतु पती-पत्नी यांचेत वाद विवाद होऊन सदर महिला यांनी मा.कौंटुबिक न्यायालयात पती विरोधात सीआरपीसी १२५(३) प्रमाणे दावा नं.२४७/२०१७ दाखल केलेला होता. यामध्ये पतीने पत्नीस दयावयाची एकूण पोटगी रक्कम रु. ७५०००/- थकविलेली होती . ती तो भरत नसल्याने मे. न्यायालयाने तीचे पती यांचे विरोधात अटक वॉरंट जारी केलेले होते. त्याचा शोध घेऊन त्याला समर्थ पोलीस ठाणे पुणे कडील पोहवा.भाग्यवंत निकम व पोशि.विजय श्रीगादी यांनी पतीस बेडया ठोकून मा.कौटंबिक न्यायालया समोर हजर केले. तेव्हा न्यायालयाने त्यास २२ महिने साध्या कैदेची शिक्षा सुनावली आहे.

आपले पत्नीचा पोटगी रक्कम न देऊन त्रास देणारे पती राजांसाठी कोर्टाचा निर्णय विचार करावयास लावणारा आहे हे मात्र नक्की .